P:_4\Desi\Chairman Election 2018/Letter

स्थळप्रत

# मुंबई विद्यापीठ


e-mail : arelection@election.mu.ac.in
Tel. No.: (022 )-68320017
(022 )-22696147


अत्यंत तातडीचे/हस्ते बटवडा

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/५३२.
११ ऑक्टोबर, २०२३.

प्रति,
प्रा. (डॉ) अरविंद लुहार
ईस्माइल कॉलेज कॅम्पस,
नटवर नगर,
जोगेश्वरी (पूर्व),
मुंबई - ४०० ०६०.

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या सभेमधील बाब क्र. ९.१ च्या ठरावानुसार मा.कुलगुरूंनी अधिष्ठात्यांशी विचार विनिमय करून, **बी.ए.एफ आणि बी.एफ.एम (फायनांशीयल मॅनेजमेंट) [BAF & BFM (Financial Management)]** या तदर्थ अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदी आपले नामनिर्देशन केले आहे. सदर अभ्यास मंडळावर झालेल्या नामनिर्देशनाबद्दल, विद्यापीठ प्रशासनातर्फे, हार्दिक अभिनंदन.

पुढे आपणांस असे कळविण्यात येते की, आपण सदर अभ्यासमंडळाचे अध्यक्ष असल्याने मुंबई विद्यापीठाच्या खालील दर्शविलेल्या समितीचे सुध्दा पदसिध्द सदस्य आहात :-

| समिती | कलम |
|---|---|
| संशोधन आणि मान्यता समिती | ३७(२)(क)(तीन) |
| **बी.ए.एफ आणि बी.एफ.एम** (फायनांशीयल मॅनेजमेंट) अभ्यासमंडळ | |

**बी.ए.एफ आणि बी.एफ.एम (फायनांशीयल मॅनेजमेंट) [BAF & BFM (Financial Management)]** या तदर्थ अभ्यास मंडळावरील आपल्या सदस्यत्वाची मुदत तात्काळ प्रभावाने सुरू होऊन दिनांक ३१ ऑगस्ट, २०२७ किंवा पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६३, ६४ आणि ६८ मधील तरतुदींच्या अधिन राहून असेल. अभ्यासमंडळावरील आपल्या नामनिर्देशनात कोणतीही विसंगती आढळल्यास विद्यापीठ आपले नामनिर्देशन रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवते.

वरील सर्व प्राधिकरणात तसेच विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासाकरिता आपल्या सक्रीय सहभागाची व मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त करतो.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४० व ४१ नुसार अभ्यासमंडळाची रचना व कामासंबंधीची माहिती तसेच कलम ६३, ६४ आणि ६८ च्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.

कृपया हे पत्र मिळाल्याची पोच दयावी.

आपला स्नेहांकित,
सही/-
(प्रा. सुनिल भिरूड)
कुलसचिव (प्र.)